# बीट्स पिलानीत 'स्वरसंध्या-२०१९' उत्साहात

प्रतिनिधी, पणजी

झुवारीनगर येथील बीट्स पिलानी गोवा कॅम्पस येथील मुख्य प्रेक्षागृहात नुकताच 'स्वरसंध्या-२०१९' हा कार्यक्रम झाला. या सांगीतिक कार्यक्रमाचे हे तिसरे वर्ष होते. कार्यक्रमात कॅम्पसमधील विद्यार्थ्यांनी मराठी संस्कृतीचे विविध पैलू उलगडताना विविध प्रकारात सुंदर कलाकृती सादर केल्या. त्यांनी गायिलेल्या 'मागे उभा मंगेश'', 'मुरलीधर श्याम'', 'माझे माहेर पंढरी'', 'हरी म्हणा कुणी'', 'वाजले की बारा'' अशा अनेक गीतांनी रसिकांना मंत्रमुग्ध करून टाकले.

या कार्यक्रमादरम्यान सादर करण्यात आलेल्या काही अजरामर हिंदी गीतांच्या 'गीतमालिकेला''सुद्धा रसिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

कार्यक्रमाची सांगता 'चिन्मया सकल हृदया'' या हृदयस्पर्शी भैरवीने झाली.

महाविद्यालयातील विद्यार्थी गायक सुकृत ताम्हणकर, रेश्मा झाकणे, मोहीत सवाने, अनुष्का गबाळे, प्रांजली रानडे यांनी सादर केलेल्या गीतांना, योगेन बोरकर (संवादिनी), वरद चिपळूणकर (संवादिनी), शुभांकर काटे (बासरी), सिद्धार्थ मिश्र (तबला), अमेय पटवर्धन (तबला), प्रणव पवार (ढोलकी), ह्रिषीक सागर (सिंथेसायझर), रजत तिरोडकर ( पखवाज) यांनी तोडीस तोड अशी साथसंगत करून कॅम्पसमधील तसेच अनेक गोमंतकीय रसिकांची वाहवा मिळविली.

प्रा. डॉ. सचिन वायगांवकर, शर्वरी कुलकर्णी यांनी अतिशय अभ्यासपूर्ण आणि खुमासदार निवेदन करून कार्यक्रमाची रंगत आणखी वाढविली.

तरुण भारत Fri, 01 November 2019
epaper.tarunbharat.com/c